# प्रेसनोट

जा.क्र.२०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३ /०३/२०१७

## पोलीस भरती –२०१७

## पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
## उमेदवारांना सुचना

पोलीस भरती २०१७ मध्ये उमेदवारांना ज्या तारखेस पोलीस शिपाई भरती करीता बोलाविण्यात आले आहे. त्या तारखेस सकाळी ०५/०० वाजता पासुन ते ०९/०० वाजता पर्यत उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच उमेदवारांना दिलेल्या तारखेच्या दिवशी सदर वेळी हजर राहणे आवश्यक राहिल. दुसरी तारीख दिली जाणार नाही याबाबत सबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांनी आवेदन अर्जात अचुक माहिती दयावी. चुकीची माहिती दिल्यास,उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.उमेदवारांची शारीरीक व लेखीचाचणी नंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरीक व लेखी चाचणीद्धारे निवड झाली म्हणुन तो पात्र ठरणार नाही.

यावर्षी प्रथम शारीरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परिक्षा तदनंतर तात्पुरती निवड यादी जाहीर केली जाईल व तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे व नंतर पात्र उमेदवारांची अंतीम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.